
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | AUG - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# प्रबोधनशिल्पी अण्णाभाऊ साठे:एक अभ्यास




**डॉ. स्वाती रा. सरोदे**
**इतिहास विभाग प्रमुख, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.**

## प्रास्ताविक :

साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते. समाजातील घडामोडींचा, स्थित्यंतरांचा, चळवळींचा प्रभाव सहित्यावर पडतो म्हणून साहित्य हे समाजपरिवर्तनाचे आणि समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन ठरते. अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील मेरुदंड म्हणून महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण भारतात परिचित आहेत. त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून मराठी साहित्यसृष्टी समृद्धच केली नाही तर तिला एक नवी दिशा देण्याचेही महत्त्वपूर्ण काम केले आहे. त्यांचे समग्र साहित्य समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, धर्मनिरपेक्षता, न्याय आणि मानवतावाद या शाश्वत मूल्यांवर आधारित आहे. अण्णाभाऊंनी मार्क्सवादी विचारधारा स्वीकारून पददलित व सोशीत जनतेसाठी लेखन केले. त्यांनी आपल्या साहित्यातून भारतीय इतिहासही मांडला आहे. त्यांनी साहित्याचे पोवाडे, लावणी, गीते, कथा-कादंबरी, प्रवासवर्णने, नाटके, लोकनाट्ये, वगनाट्ये इत्यादी विविध प्रकार हाताळले. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या प्रबोधनावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांच्या साहित्याचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.

## उद्दिष्टे

- अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य निर्मिती मागील प्रेरणांचा शोध घेणे.
- अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील ऐतिहासिक घटनांच्या माध्यमातून स्पष्ट होणाऱ्या प्रबोधनाचा परामर्श घेणे
- अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा समाजमनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधात अण्णाभाऊ साठे यांच्या निवडक शाहिरी, पोवाडे, वगनाट्ये व कथा-कादंबरी यांचा विचार केला आहे. तसेच विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे.आणि प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर केला आहे.

## विषय विवेचन

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म 1 ऑगस्ट, 1920 रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे झाला.[1] सगळ्याच संधी नाकारलेल्या समाजात जन्मलेल्या भाऊंनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रयत्नपूर्वक अक्षरज्ञान मिळविले. चरितार्थासाठी त्यांना मुंबईला जावे लागले आणि सुरुवातीस पडेल ते काम करावे लागले. तिथे कामगारांच्या समवेत काम करत असताना त्यांच्या कष्टमय जीवनाचा आणि लढाऊपणाचा भाऊंना जवळून अनुभव आला. मुंबईची सुरुवातीची वर्ष हे त्यांच्या जडणघडणीची वर्षं ठरली. सन 1936 मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड श्रीपाद डांगे यांच्या प्रभावाखाली ते आले आणि पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते बनले. पक्षाच्या सभांचे आयोजन करणे, हॅण्डबिले वाटणे, मोर्चे काढणे, पोवाडे, लोकगीते ऐकविणे इत्यादी गोष्टींमुळे कम्युनिस्ट लोकांच्या वर्तुळात ते सर्वांना हवेहवेसे वाटू लागले. काही काळ त्यांनी चुलत भावाच्या तमाशाच्या फडात काम केले होते. त्यांनी गण व वगनाट्य लिहावे म्हणून कॉम्रेड पगारे यांनी प्रयत्न केले.[2] त्यामुळे ते लिहिते झाले आणि त्यानंतर त्यांच्या लिखाणाला बहर आला. ते केवळ लेखक नव्हते तर जनआंदोलनात सक्रिय झालेले कार्यकर्तेही होते. कोहिनूर मिलमध्ये काम करताना त्यांचा कामगार चळवळीशी संबंध आला.

**शाहिरी रचना :** मराठी लोकसाहित्यात शाहिरीला अत्यंत महत्त्व आहे. शाहिरीच्या माध्यमातून अण्णांनी वास्तवातील दैनंदिन घटनांचा, तत्कालीन जीवनाचा पटच मांडला आहे. शेतकरी, कामगार आणि दलितांच्या दैनंदिन जीवनातील अनेक प्रश्न आणि त्या प्रश्नांची उकल करण्यासाठी कष्टकऱ्यांना जागे करून, त्यांच्यात आपल्या हक्कांसाठी लढण्याची जिद्द निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

दमान हळूहळू निघाला छकडा I
नाग मोडीत रखडत वाकडा II [3]

या आपल्या ‘छकडा’ या रचनेत त्यांनी भांडवलदार व शासन हातात हात घालून चालतात व कष्टकऱ्यांचे कसे शोषण करतात याचे उपरोधिक वर्णन केले आहे.

पहा पर्व चालले आजचे Iसंयुक्त महाराष्ट्राचे II [4]

अशा रचनेतून त्यांनी लोकभावना चेतवित ठेवली. या चळवळीच्या संदर्भात 'माझी मैना गावावर राहिली' या त्यांच्या लावणीला आगळेवेगळे महत्त्व आहे. या लावणीतून त्यांनी पत्नीचा जाणवणारा दुरावा व बेळगाव-कारवार इत्यादी भाषिक प्रदेश दुरावल्याची महाराष्ट्रीयनांना वाटणारी खंत यांचा समन्वय साधला आहे.

**तमाशा :** लावणी तमाशा वगनाट्याला लोकशिक्षणाच्या दिशेने वळविण्याचे श्रेय अण्णाभाऊंनाच जाते. त्यांनी तमाशात गणेश वंदनेऐवजी पहिल्या नमनाचा मान मातृभूमी, हुतात्मे, राष्ट्रपुरुष यांना देण्याचे बहुमूल्य कार्य केले. यातून त्यांचा समाजाकडे व मात्रुभूमिकडे बघण्याचा प्रगल्भ दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्यांनी 'लाल बावटा' या पथकाद्वारे तमाशा सादर करून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला चेतना दिली. त्यांच्या तमाशांना हजारो लोक उपस्थित राहतात म्हणून मोरारजीभाई देसाई यांनी तमाशावर बंदी आणली, तेव्हा अण्णाभाऊंनी तमाशाचे लोकनाट्य असे बारसे करून 'माझी मुंबई' हे वगनाट्य मुंबईत सादर केले. माझी मुंबई हे वगनाट्य त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पायाभरणी करण्यासाठी लिहिले.

**पोवाडे :** गौरव, स्तुती किंवा यशोगान म्हणजे पोवाडा होय. समाजाच्या जडणघडणीसाठी योगदान दिलेल्या विभुतींचा गौरव पोवाड्यातून केला जातो. अण्णाभाऊ जाज्वल्य देशप्रेमी होते. त्यांचे मुंबई, महाराष्ट्र व भारतावर मनापासून प्रेम होते.

ते वीर मावळे गडी धन्य जाहले I
स्वातंत्र्य संगरी करी शस्त्र घेतले II [5]

या 'महाराष्ट्राची परंपरा' या रचनेत त्यांनी महाराष्ट्राचा बाराव्या शतकापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा इतिहास वर्णिला आहे. या रचनेत त्यांनी महाराष्ट्रातील सामान्य माणसाच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकत, महाराष्ट्रात झालेल्या परिवर्तनवादी चळवळीचा आढावा घेतला आहे.

अण्णाभाऊंनी आपल्या पोवाड्यांतून भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास प्रभावीपणे स्पष्ट केला आहे. 1857च्या बंडापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील टप्पे, 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या पोवाड्यात पहावयास मिळतात. 'तेलंगणाचा संग्राम' या पोवाड्यात त्यांनी हैदराबाद संस्थानातील जनतेचे स्वातंत्र्ययुद्ध चित्रबद्ध केले आहे. याशिवाय अंमळनेरचे हुतात्मे, बंगालची हाक हे त्यांचे पोवाडे ऐतिहासिक घटनांचे हुबेहूब वर्णन करतात. त्यांचा 'स्टालिनग्रांडचा पोवाडा' विशेष गाजला. त्यावरून त्यांची जागतिक इतिहासाची जाण लक्षात येते.चिनीजणांची मुक्तीसेना आणि बर्लिनचा पोवाडा या त्यांच्या पोवाड्यांतून जागतिक पातळीवरील कामगार चळवळीचा त्यांनी सखोल अभ्यास केल्याचे स्पष्ट होते.

**कथा :** अण्णाभाऊंच्या वैजयंता, वारणेच्या खोऱ्यात, माकडीचा माळ इत्यादी कथा व कादंबऱ्या बहुचर्चित राहिल्या. या रचनांमधील त्यांच्या नायिका अत्यंत प्रभावी आहेत. पुरुषप्रधान व्यवस्थेत सर्वप्रकारचे दुःख झेलत दया, माया, प्रेम आणि करुणा रूपातील त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत उत्तमपणे अण्णाभाऊंनी रेखाटले आहे. त्यांच्या कथांमधील नायिका स्वाभिमानी आणि सामर्थ्यशाली असल्यामुळे नियतीवरही मात करताना दिसतात. त्या अत्यंत प्रामाणिक आणि स्वाभिमानी असून संघर्षाच्या माध्यमातून सर्व दुःखांवर आणि प्रतिकूल परिस्थितीवर विजय प्राप्त करताना दिसतात.

## समारोप

मराठीतील ग्रामीण ,दलित ,प्रादेशिक साहित्यावर अण्णाभाऊंचे प्रभुत्व होते. त्यांच्या साहित्याचा अनुवाद अनेक भारतीय भाषांबरोबरच रशियन, चेक, पोलीश, फ्रेंच इंग्रजी यांबरोबरच जगातील 27 भाषांमध्ये

झाला आहे. आपल्या साहित्यातून त्यांनी पुरोगामी, लढाऊ, देशभक्तीपर व स्त्रीवादी विचारांचा अविष्कार केला. त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून लोकसंघटन, लोकजागृती व प्रबोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणात केले. ते एका विशिष्ट जातीचे, जमातीचे व समाजाचे नव्हते तर जगातील कष्टकऱ्यांचे, पीडितांचे, शोषितांचे प्रतिनिधी होते असेच म्हणावे लागेल. त्यांच्या साहित्यातून महाराष्ट्राच्या, भारताच्या तसेच जगाच्या इतिहासावरही प्रकाश पडतो. म्हणून त्यांचे साहित्य हे महत्त्वाचे ऐतिहासिक साधन ठरते.

## निष्कर्ष

1) अण्णाभाऊंच्या साहित्यावर साम्यवादी विचारांचा प्रभाव असल्याचे स्पष्ट होते.
2) अण्णाभाऊंच्या साहित्यामुळे कामगार, कष्टकरी व शेतकरी यांना त्यांच्या हक्कांची जाणीव होऊन ते संघटित झाले व आपल्या न्याय हक्कांसाठी लढु लागले.
3) अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून अत्यंत प्रभावी आणि सामर्थ्यशाली स्त्रीचे चित्रण केले आहे.
4) अण्णाभाऊंच्या साहित्यातून महाराष्ट्राचा, भारताचा तसेच स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास बहुजनांच्यापर्यंत पोहोचला आहे.

## संदर्भ

1) https://marathivishwakosh.org
2) अर्जुन डांगळे, उपाध्ये पेंडसे-नाईक, सावरकर (संपा.), लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङमय, प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.6
3) डॉ. किरवले कृष्णा, दलित चळवळ आणि साहित्य, प्रतिभा प्रकाशन, पुणे, 1996, पृ. 84
4) अर्जुन डांगळे, उनि,पृ.57
5) कित्ता,पृष्ठ 29